IJFANS INTERNATIONAL JOURNAL OF FOOD AND NUTRITIONAL SCIENCES

ISSN PRINT 2319 1775 Online 2320 7876

*Research Paper* **© 2012 IJFANS. All Rights Reserved**, UGC CARE Listed ( Group -I) Journal Volume 10, S Iss 4 , 2021

# नवीन शैक्षणिक धोरण व अंगणवाडी सेविकासमोरील आव्हाने

**प्रा. सय्यद बेबीअफरोज अहेमद[1] आणि प्रा. डॉ. वंदना नामदेव बनकर**

**[1]सहायक प्राध्यापक, गृहशास्त्र विभाग,**
**कालिकादेवी कला वाणिज्यव विज्ञान महाविद्यालय, शिरूर कासार ता.शिरूर का.जि. बीड**

**[2]संशोधक मार्गदर्शक व विभागप्रमुख, गृहशात्र विभाग,**
**कला व विज्ञान महाविद्यलाय, आहेर चिंचोली (लिं.) ता. कन्नड जि. औरंगाबाद**

**सारांश:**

नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाने भारतातील शिक्षण प्रणालीमध्ये मोठा बदल घडवून आणण्याचे उद्दिष्ट ठेवले आहे.या धोरणाचा सर्वात महत्त्वपूर्ण भाग म्हणजे अंगणवाडी शिक्षणाला दिलेले महत्त्व.पूर्वी अंगणवाडीला बालकांच्या पोषण आणि आरोग्याशी संबंधित सेवा पुरवणारी संस्था म्हणून पाहिले जायचे, तर नवीन धोरणानुसार अंगणवाडीला बालकांच्या संपूर्ण विकासासाठीचे एक मंच म्हणून पाहिले जात आहे.या धोरणानुसार, अंगणवाडीमध्ये बालकांना भाषिक आणि गणितीय ज्ञान देण्यावर भर दिला जाणार आहे.याशिवाय, बालकांच्या सर्वांगीण विकासासाठी खेळ, कला आणि सांस्कृतिक कार्यक्रम आयोजित केले जातील. अंगणवाडी शिक्षिका आणि मदतनीसांना प्रशिक्षण देऊन त्यांना अधिक प्रभावीपणे काम करण्यास सक्षम करण्याचा प्रयत्न केला जाणार आहे.प्रस्तुत शोधनिबंधात राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० चाप्रारंभिक बाल्यावस्थेतील शिक्षण, संप्राथमिक शिक्षण, अंगणवाडी केंद्र, अंगणवाडी सेविका व मदतनिस यांच्यादृष्टीकोणातून आढावावेतला आहे. तसेच देशातील अंगणवाडी केंद्रांची वास्तविकता सांगूनराष्ट्रीय शैक्षणिक धोरणासमोरील भविष्यातील आव्हाने व उपाय सादर केले आहेत. तसेचराष्ट्रीय शैक्षणिक धोरण (२०२०) च्या प्रभावी व कठोर अंमलबजावणीवर प्रकाश टाकला आहे.

**मुख्य शब्दः राष्ट्रीय शैक्षणिक धोरण, अंगणवाडी केंद्र, अंगणवाडी सेविका**

## प्रस्तावना

केंद्रीय मंत्रिमंडळाने २०२० च्या नव्या राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाला दि. २९ जुलै २०२० रोजी मंजुरी दिली. या धोरणामुळे शालेय आणि उच्च शिक्षणात अधिकप्रमाणात बदल व सुधारणा करण्यात आल्याचे दिसून येते. हे २१ व्या शतकातील पहिले राष्ट्रीयशैक्षणिक धोरण असून ते३४ वर्ष जुन्या १९८६ व्याराष्ट्रीय शैक्षणिक धोरणाची जागा घेणार आहे. या नविन राष्ट्रीयशैक्षणिक

ISSN PRINT 2319 1775 Online 2320 7876

*Research Paper* **© 2012 IJFANS. All Rights Reserved**, UGC CARE Listed ( Group -I) Journal Volume 10, S Iss 4 , 2021

धोरणानुसार शालेय शिक्षणाच्या अभ्यासकमाचा आराखडा ५+३+३+४ या मांडणीनुसार बनविला जावून याची विभागणी पायाभूत स्तर- वय ३ ते ८ वर्ष, तयारीचा स्तर वय ८ ते ११ वर्ष, मधिल स्तर वय ११ ते १४ वर्ष, दुसरा स्तर -वय १४ ते १८ वर्ष अशा चार स्तरांमध्ये केली जाईल. नफाविरहीत तत्वांवरील शाळांचे प्रचालन करून अभ्यासक्रम व अध्यापनशास्त्रांतील आमुलाग्र बदलांव्दारे सर्वागिण विकास, शोधक विचारक्षमता, सर्जनशिलता, शास्त्रीय मनन, सुसंवाद, परस्परसहकार्य, बहुभाषिकता, समस्या निवारण, नीतीतत्वे, सामाजीक बांधिलकी व अंकिय साक्षरता अशाप्रकारच्या कौशल्य अध्ययनाला चालना देण्याची तरतूद केली आहे.

भारतातील बालकांच्या सर्वांगीण विकासासाठी अंगणवाडीची भूमिका अत्यंत महत्त्वपूर्ण आहे. अंगणवाडीमध्ये बालकांना पोषणयुक्त आहार, आरोग्य सेवा आणि प्रारंभिक शिक्षण मिळते.नवीन शैक्षणिक धोरणानुसार, अंगणवाडीला बालकांच्या शैक्षणिक विकासासाठी अधिक जबाबदार बनवण्याचा प्रयत्न केला जात आहे. अंगणवाडी शिक्षण हे बालकाच्या जीवनातील सर्वात महत्त्वाच्या टप्प्यातील एक आधारस्तंभ आहे.या कालावधीत बालक शारीरिक, मानसिक, सामाजिक आणि संज्ञानात्मक विकासाच्या प्रक्रियेतून जात असतात.अंगणवाडी या प्रक्रियेला गति देण्यात महत्त्वपूर्ण भूमिका बजावते.यंदाच्या शैक्षणिक वर्षापासून पूर्वप्राथमिक स्तरावरही (अंगणवाडी) राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाची अंमलबजावणी सुरू करण्यात येणार आहे. याधोरणानुसार तयार केलेल्या अभ्यासक्रमावर आधारित पाठ्यपुस्तके राज्यातील १ लाख ३१ हजार अंगणवाड्यांना पुरवली जाणार आहेत. बदलत्या काळानुसार विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी उच्च शिक्षणात राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाची अंमलबजावणी सुरू करण्यात आलेली आहे.

पूर्वप्राथमिक शिक्षणाचा समावेश औपचारिक शिक्षणामध्ये करण्यात आलेला नव्हता. त्यामुळे अक्षरांची तोंडओळख, गाणी, गोष्टी, खेळ अशा स्वरूपात शैक्षणिक प्रक्रिया चालत होती. मात्र, राष्ट्रीय शैक्षणिक धोरणात शैक्षणिक चौकटच बदलण्यात आली आहे. त्यामुळे पूर्वप्राथमिक शिक्षणाचा औपचारिक शिक्षणात समावेश झाला आहे.पूर्वप्राथमिक शिक्षणात पायाभूत साक्षरता आणि अंकज्ञान महत्त्वाचे मानण्यात आले आहे. या अनुषंगाने धोरणात प्रस्तावित केल्यानुसार राष्ट्रीय शैक्षणिक संशोधन आणि प्रशिक्षण परिषदेने (एनसीईआरटी) पूर्वप्राथमिक किंवा पायाभूत स्तरासाठीचा अभ्यासक्रम आराखडा तयार केला. या आराखड्यानुसार राज्यस्तरासाठीच्या अभ्यासक्रमाची राज्य शैक्षणिक संशोधन आणि प्रशिक्षण परिषदेने (एससीईआरटी) निर्मिती केली आहे.

**उद्दिष्टे**

ISSN PRINT 2319 1775 Online 2320 7876
*Research Paper* © 2012 IJFANS. All Rights Reserved, UGC CARE Listed ( Group -I) Journal Volume 10, S Iss 4 , 2021

- अंगणवाडीमध्ये बालकांना भाषिक आणि गणितीय ज्ञान देणे.
- बालकांच्या सर्वांगीण विकासासाठी खेळ, कला आणि सांस्कृतिक कार्यक्रम आयोजित करणे.
- अंगणवाडी शिक्षिका आणि मदतनीसांना प्रशिक्षण देणे.
- अंगणवाडीची पायाभूत सुविधा सुधारणे.
- अंगणवाडी आणि प्राथमिक शाळेतील अभ्यासक्रमातील एकात्मता साधणे.

**गृहीतके**

- अंगणवाडीमध्ये गुणवत्तापूर्ण शिक्षण देऊन बालकांच्या शैक्षणिक पातळी सुधारता येईल.
- अंगणवाडी शिक्षिका आणि मदतनीसांच्या प्रशिक्षणाद्वारे शिक्षणाची गुणवत्ता वाढेल.
- अंगणवाडीची पायाभूत सुविधा सुधारण्यामुळे बालकांना अधिक चांगले वातावरणात शिकण्याची संधी मिळेल.
- अंगणवाडी आणि प्राथमिक शाळेतील अभ्यासक्रमातील एकात्मतेमुळे शैक्षणिक प्रक्रियेत सुसंगती येईल.

❖ **नवीन शैक्षणिक धोरणातील विशिष्ट तरतुदींचा अंगणवाडीवर होणारा प्रभाव:**

- **अंगणवाडीची व्याप्ती वाढणे:**

➢ नवीन धोरणाने अंगणवाडीच्या व्याप्तीत वाढ करण्याचे उद्दिष्ट ठेवले आहे.अधिकाधिक बालकांना अंगणवाडीच्या सुविधा उपलब्ध करून देण्याचा प्रयत्न केला जाणार आहे.
➢ यामुळे अधिकाधिक बालकांना गुणवत्तापूर्ण पूर्व-प्राथमिक शिक्षण मिळण्याची शक्यता वाढेल.

- **अंगणवाडीतील शिक्षण पद्धतींमध्ये बदल:**

➢ नवीन धोरणानुसार अंगणवाडीतील शिक्षण पद्धतींमध्ये बदल करण्यात येणार आहे.
➢ खेळ, गीत, कथा सांगणे, चित्रकला इत्यादी क्रियांद्वारे बालकांच्या सर्वांगीण विकासावर भर दिला जाणार आहे.
➢ बालकांना भाषा, गणित आणि वैज्ञानिक ज्ञान देण्यावरही भर दिला जाणार आहे.

- **अंगणवाडी शिक्षकांचे प्रशिक्षण:**

ISSN PRINT 2319 1775 Online 2320 7876

*Research Paper* **© 2012 IJFANS. All Rights Reserved**, UGC CARE Listed ( Group -I) Journal Volume 10, S Iss 4 , 2021

- अंगणवाडी शिक्षकांना नवीन शैक्षणिक पद्धती शिकवण्यासाठी प्रशिक्षण देण्यात येणार आहे.
- त्यांना बाल विकास आणि शैक्षणिक तंत्रज्ञानाबद्दलचे ज्ञान देण्यात येईल.
- यामुळे अंगणवाडी शिक्षक अधिक प्रभावीपणे बालकांना शिकवू शकतील.

- **अंगणवाडी आणि प्राथमिक शाळेतील एकात्मता:**

  - नवीन धोरणानुसार अंगणवाडी आणि प्राथमिक शाळेतील अभ्यासक्रमातील एकात्मता साधण्याचा प्रयत्न केला जाणार आहे.यामुळे बालकांना शाळेत सहजतेने जुळवून घेता येईल.

- **अंगणवाडीची पायाभूत सुविधा वपालकांची सहभागिता:**

- अंगणवाडीच्या पायाभूत सुविधा सुधारण्यावर भर दिला जाणार आहे.
- अंगणवाड्यांमध्ये स्वच्छ पाणी, स्वच्छतागृह आणि खेळण्यांची व्यवस्था केली जाईल.
- पालकांची अंगणवाडीतील सहभागिता वाढवण्याचा प्रयत्न केला जाणार आहे
- पालकांना बालकांच्या शिक्षणात सहभागी करून घेतले जाईल.
- बालकांचा सर्वांगीण विकास होईल.वबालकांची शैक्षणिक पातळी सुधारेल
- बालकांना शाळेत सहजतेने जुळवून घेता येईल,अंगणवाडी शिक्षकांची कार्यक्षमता वाढेल. अंगणवाडीची प्रतिमा उंचावेल.

- **अभिनव अभ्यासक्रम व अध्यापनशास्त्राची पुनर्रचनाः**

शालेय शिक्षणाच्या अभ्यासक्रमाचा आराखडा ५+३+३+४ रचनेनुसार बनविला जाउन त्यात खेळ, कौशल्य अध्ययनाला चालना देण्याची तरतूद केली आहे. यात विद्यार्थ्यांना विषय निवडीस वाव असून दुसऱ्या शालेय स्तरांदरम्यान विषय बदलण्याची संधी व पर्याय उपलब्ध असतील. मातृभाषेतून सक्षण, दिव्यांगासाठी शैक्षणिक साहित्याचा विकास, त्रिभाषीय सूत्र, मोठ्या प्रमाणात शिक्षकांची नियुक्ती

- **भर्ती व पदस्थापनाः**

व्यासंगी, उत्स्फूर्त, उच्चशिक्षित, व्यावसायिकदृष्टया प्रशिक्षित आणि सुसज्ज व गुणवत्ताधारक शेक्षकांची सर्व स्तरांवरील शालेय शिक्षणासाठी कडक व नियमबध्द प्रक्रियेतून नियुक्ती केली जाईल. विनराष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० मधिल अंगणवाडी केंद्राविषयी

महत्वाच्या तरतूदी अंगणवाड्या, पूर्व प्राथमिक विद्यालये, प्राथमिक विद्यालये आणि प्री स्कूल इत्यादीच्या माध्यमातून नरभिक बाल्यावस्था निगा आणि शिक्षणाला सुरू केलं जाउन शिक्षणाच्या सार्वत्रीकीकरणासाठी अंगणवाडी इंद्रांना उच्च दर्जाच्या पायाभूत सुविधा, खेळण्याची साधने आणि परिपूर्ण प्रशिक्षीत अंगणवाडी सेविकासह इजबूत केलं जाईल. प्रत्येक अंगणवाडीमध्ये शिक्षणाच्या समृध्द वातावरणाबरोबरच योग्य रचनेची, हवेशिर, शलसुलभ इमारत निर्माण केली जाईल.

अंगणवाडीमधून प्राथमिक विद्यालयात मुलांना सहज प्रवेशासाठी अंगणवाडी केंद्रातील मुले प्राथमिक विद्यालयातील शिक्षकांना भेटू शकतील, अंगणवाडी केंद्रांना शाळेच्या परिसराशी एकिकृत केलं जाईल जेणे करून अंगणवाडी केंद्रातील मुलांना, शिक्षकांना व मुलांच्या आई-वडिलांना शाळेच्या विविध कार्यक्रमामध्ये सहजभाग घेता येईल.माध्यान्ह भोजन योजनेला प्राथमिक विद्यालयाबरोबरच अंगणवाडी केंद्रातील मुलांपर्यंत विस्तारीत केलं जाईल. अंगणवाडीमध्ये बालकांच्या विकासाची देखभाल व आरोग्य तपासणीची व्यवस्था उपलब्धराहिल.अंगणवाडी सेविकांना एनसीईआरटी व्दारे विकसीत अभ्यासक्रमानुसार योग्य प्रशिक्षण दिलं जाईल. प्रांरभिक बाल्यावस्था निगा आणि शिक्षणाकरिता १२ वी किंवा त्यापेक्षा जास्त शैक्षणिक पात्रता धारण करणाऱ्या अंगणवाडी सेविकांना ६ महिने कालावधिचा प्रमाणपत्र कोर्स तर १२ वी पेक्षा कमी शैक्षणिक पात्रता धारण करणाऱ्या अंगणवाडी सेविकांना १वर्षाचा डिप्लोमा कोर्स करणे आवश्यक राहिल. केंद्र सरकारने १९७२ पासून प्रामुख्याने खेड्यापाडयातून अंगणवाड्यांची योजना सुरू केली असून आज देशभरात सुमारे १३,७७,००० अंगणवाड्या तर महाराष्ट्रात १,०८,००५ अंगणवाड्या चालू आहेत.

भारतातील अंदाजे २ लाख तर महाराष्ट्रातील ४०,००० अंगणवाड्यांना स्वतःची इमारतदेखील नाही. ३,६२,९४० अंगणवाडी केंद्रामध्ये शौचालयाची तर १,५९,५६८ अंगणवाडी केंद्रामध्ये पिण्याच्या पाण्याची सुविधा उपलब्ध नाही. कित्येक अंगणवाड्या जागा नसल्याने भाड्याच्या जागेत, मंदिराचा ओटा किंवा गावच्या मोकळ्या पटांगणात भरतात. अनेक अंगणवाड्यांना विद्युत पुरवठा नाही.अशाहीस्थितीत अंगणवाड्याचे कार्य सुरूच आहे. अंगणवाड्यासुमारे करोडो मुलांपर्यंत आरोग्य सेवा पुरवित असल्या तरी त्यातून बालशिक्षणाचा अंश नगण्यच आहे. समाजसुधारणा व राष्ट्र उभारणीचा पूर्वप्राथमिक शिक्षण हा बळकट पाया आहे. नविन शैक्षणिक धोरणाच्या माध्यमातून अंगणवाड्यांमधील पूर्वप्राथमिक शिक्षणाला अधिकृत दर्जा मिळणार असला तरी अंगणवाडबासमोरील आजच्या समस्या वेळीच दूर करणे आवश्यक आहे.

- **अंगणवाडी केंद्रांची वास्तविकताः**

ISSN PRINT 2319 1775 Online 2320 7876

*Research Paper* **© 2012 IJFANS. All Rights Reserved**, UGC CARE Listed ( Group -I) Journal Volume 10, S Iss 4 , 2021

केंद्र सरकारने १९७२ पासून प्रामुख्याने खेड्यापाडयातून अंगणवाड्यांची योजना सुरू केली असून आज देशभरात सुमारे १३,७७,००० अंगणवाड्या तर महाराष्ट्रात १,०८,००५ अंगणवाड्या चालू आहेत. भारतातील अंदाजे २ लाख तर महाराष्ट्रातील ४०,००० अंगणवाड्यांना स्वतःची इमारतदेखील नाही. ३,६२,९४० अंगणवाडी केंद्रामध्ये शौचालयाची तर १,५९,५६८ अंगणवाडी केंद्रामध्ये पिण्याच्या पाण्याची सुविधा उपलब्ध नाही. कित्येक अंगणवाड्या जागा नसल्याने भाड्याच्या जागेत, मंदिराचा ओटा किंवा गावच्या मोकळ्या पटांगणात भरतात. अनेक अंगणवाड्यांना विद्युत पुरवठा नाही. अशाहीस्थितीत अंगणवाड्याचे कार्य सुरूच आहे. अंगणवाड्यासुमारे करोडो मुलांपर्यंत आरोग्य सेवा पुरवित असल्या तरी त्यातून बालशिक्षणाचा अंश नगण्यच आहे. समाजसुधारणा व राष्ट्र उभारणीचा पूर्वप्राथमिक शिक्षण हा बळकट पाया आहे. नविन शैक्षणिक धोरणाच्या माध्यमातून अंगणवाड्यांमधील पूर्वप्राथमिक शिक्षणाला अधिकृत दर्जा मिळणार असला तरी अंगणवाडबासमोरील आजच्या समस्या वेळीच दूर करणे आवश्यक आहे.

- **आव्हानेः**

१. महाराष्ट्रातील पूर्वप्राथमिक शिक्षणाच्या वयातील म्हणजो ३ ते ८ या वयोगटातील मुलांची संख्या दौड कोटींच्या वर असून या सर्वांना दर्जेदार, गुणवत्तापूर्ण शिक्षण देणे ही आव्हानात्मक बाब आहे.

२. सध्या फार मोठ्या प्रमाणात खजगी, मॉन्टेसरी, केजी, नर्सरी अशा इंग्रजी माध्यमांच्या शाळांचे पेव फुटून त्यावर कोणाचेही नियंत्रण राहिले नाही. या शाळा स्वयंभू असून त्यांच्या अनिवार्य तपासणीसाठी कायदा करून त्याची कडक अंमलबजावणी होणे आवश्यक आहे.

३. शिक्षण संस्थांच्या मोठमोठ्या इमारती व त्यातील भौतीक सुविधांचे नियोजन आणि निर्मिती करणे फार अवघड आहे.

४. उपलब्ध मनुष्यबळ दुसऱ्या शैक्षणिक संस्थेत समायोजित करणे वाटते तितके सोपे नाही.

५. रिक्त जागांची संख्या ही सुद्धा आव्हानात्मक बाब आहे.

६. अंगणवाडी सेविका व मदतनिस यांच्यासमस्या दूर करणे आवश्यक आह

ISSN PRINT 2319 1775 Online 2320 7876

*Research Paper* © 2012 IJFANS. All Rights Reserved, UGC CARE Listed ( Group -I) Journal Volume 10, S Iss 4 , 2021

- **उपाय:**

- ➢ नियोजन पध्दतीने अंगणवाड्या तसेच शैक्षणिक संस्थांच्या इमारतीची निर्मिती केली पाहिजे. भौतिक सुविधांचा विकास योजनाबद्ध रितीने करावा.
- ➢ विनाअनुदानित धोरण बंद करून सर्व संस्था अनुदानित असाव्यात.
- ➢ निवड प्रक्रिया अधिक पारदर्शक करावी. तसेच नियुक्त व्यक्तिना प्रशिक्षण देउन नविन बदलसाठी त्यांना तयार करावे.
- ➢ नविन राष्ट्रीयशैक्षणिक धोरण २०२० च्या प्रभावी अंमलबजावणीसाठी सरकारला मोठ्या प्रमाणावर आर्थिक तरतूद करावी लागेल. शालेय शिक्षणाच्या आर्थिक तरतूदीपैकी ५० टक्के वाटा हा पूर्वप्राथमिक शिक्षणासाठी ठेवावा लागेल. मोठ्या भांडवली खर्चाची तरतूद करून अंगणवाड्यांनाप्राधान्य द्यावेलागेल.

- **सारांश:**

- ➢ नविन राष्ट्रीयशैक्षणिक धोरण २०२० मध्ये अंगणवाडी केंद्र, पूर्वप्राथमिक शिक्षण, अंगणवाडीसेविका, अंगणवाडी मदतनिस इ. बाबत सकारात्मक तरतूदी आहेत. परंतू देशभरातील अंगणवाडी केंद्रांची सद्यस्थिती समाधानकारक नाही.
- ➢ देशातील लाखो अंगणवाडी केंद्राकडे स्वतःची इमारत नसून त्याचे कार्य इमारतीविना कसेबसे चालविले जाते. अनेक अंगणवाडी केंद्रांमध्ये विजेच्या पुरवठ्याची व पिण्याच्यापाण्याची सुविधा देखील नाही.
- ➢ अंगणवाडी केंद्रांच्या सद्यस्थितीमध्ये सुधारणा करण्यासाठी आणि नविन राष्ट्रीयशैक्षणिक धोरणाची प्रभावी व कठोर अंमलबजावणी करण्यासाठी केद्रिय अर्थसंकल्पात मोठ्या प्रमाणात आर्थिक तरतूद करणे
- ➢ आवश्यक आहे. अन्यथा नविन राष्ट्रीयशैक्षणिक धोरण हे कागदावरच राहण्याची शक्यता नाकारता येणारनाही.

- **निष्कर्ष:**

अंगणवाडी हे बालकाच्या जीवनातील सर्वात महत्त्वाचे शिक्षण केंद्र आहे.अंगणवाडी शिक्षण बालकांच्या शारीरिक, मानसिक, सामाजिक आणि संज्ञानात्मक विकासासाठी आवश्यक आहे.नवीन शैक्षणिक धोरणानुसार अंगणवाडीला अधिक महत्त्व दिले जात आहे, ही एक सकारात्मक बाब आहे.नवीन शैक्षणिक धोरणाने अंगणवाडी शिक्षणाला एक नवीन दिशा दिली आहे.या धोरणाच्या अंमलबजावणीनंतर अंगणवाडी भारतातील बालकांच्या सर्वांगीण विकासासाठी एक महत्त्वपूर्ण मंच

ISSN PRINT 2319 1775 Online 2320 7876
*Research Paper* **© 2012 IJFANS. All Rights Reserved**, UGC CARE Listed ( Group -I) Journal Volume 10, S Iss 4 , 2021

बनू शकते.नविन राष्ट्रीयशैक्षणिक धोरण २०२० मध्ये अंगणवाडी केंद्र, पूर्वप्राथमिक शिक्षण, अंगणवाडीसेविका, अंगणवाडी मदतनिस इ. बाबत सकारात्मक तरतूदी आहेत. परंतू देशभरातील अंगणवाडी केंद्रांची सद्यस्थिती समाधानकारक नाही. देशातील लाखो अंगणवाडी केंद्राकडे स्वतःची इमारत नसून त्याचे कार्य इमारतीविना कसेबसे चालविले जाते. अनेक अंगणवाडी केंद्रांमध्ये विजेच्या पुरवठ्याची व पिण्याच्यापाण्याची सुविधा देखील नाही.

अंगणवाडी केंद्रांच्या सद्यस्थितीमध्ये सुधारणा करण्यासाठी आणि नविन राष्ट्रीयशैक्षणिक धोरणाची प्रभावी व कठोर अंमलबजावणी करण्यासाठी केद्रिय अर्थसंकल्पात मोठ्या प्रमाणात आर्थिक तरतूद करणेआवश्यक आहे. अन्यथा नविन राष्ट्रीयशैक्षणिक धोरण हे कागदावरच राहण्याची शक्यता नाकारता येणारनाही.नविनराष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० मध्ये पूर्वप्राथमिक शिक्षणाला पाया मानून अग्रस्थान देण्यात आलेआहे. पूर्वप्राथमिक शिक्षण हा आजच्या प्रगत जगात भावी समाजनिर्मितीचा पाया असून यात शिक्षण जान्या बालकांमधूनच उदयाचा सुजाण प्रौढ समाज जन्म घेत राहिल. प्रारंभिक बाल्यावस्थेतील शिक्षणावर धोरण भर देत असून २०२५ पर्यंत ३ ते ८ वर्ष वयोगटातील प्रत्येक मुलांना मोफत, सुरक्षित, उच्च मुक्त, विकासात्मकदृष्ट्या योग्य शिक्षण देण्याची केंद्र सरकारने या धोरणाच्या माध्यमातून तरतूद करीत क क्रांतिकारी पाउल उचलले आहे. याशिवाय बालशिक्षणाला शिक्षण हक्क कायदा २००९ च्या कक्षेत आणून व त्याचा विस्तार करून ३ ते १८ वयोगटातील प्रत्येक मुलांसाठी मोफत व सक्तीचे दर्जेदार क्षण उपलब्ध करून देण्याचा धाडसी विचार मांडला आहे.

❖ **संदर्भ सूचीः**

१. राष्ट्रीय शिक्षा नीति २०२०, मानव संसाधन विकास मंत्रालय भारत सरकार

२. द इकॉनॉमिक टाईम्स, १७ डिसेंबर २०१९, सरकार २.५ लाख अंगणवॅक्स अपग्रेड करण्याची योजना आखत आहेपुढील 5 वर्षांत केंद्रे: महिला आणि बाल विकास मंत्रालयाचे अधिकारी

३. महाराष्ट्र शासन महिला व बालकल्याण विभाग द्वारा प्रकाशित " मार्गदर्शिका, माता व बालक संरक्षण कार्ड." ४. वेबसाइट विकासपिडीया

५. वेबसाइटआय सी डी एस

६. लोकसत्ता, २४ ऑगस्ट २०१७, "राज्यातील ४० हजाराहून अधिक अंगणवाड्या इमारतीविना.

7. Government plans to upgrade *2.5* lakh anganwadicentres in next *5* years: Women and Child Development Ministry

ISSN PRINT 2319 1775 Online 2320 7876
Research Paper © 2012 IJFANS. All Rights Reserved, UGC CARE Listed ( Group -I) Journal Volume 10, S Iss 4 , 2021

official. economictimes.indiatimes.com (English भाषेत). 17 December 2019. 9 November 2022 रोजी मूळ पान पासून संग्रहित. 9 November 2022 रोजी पाहिले.

8. "अंगणवाडीची कार्ये". womenchild.maharashtra.gov.in (Marathi भाषेत). 9 November 2022. 9 November 2022 रोजी मूळ पान पासून संग्रहित. 9 November 2022 रोजी पाहिले.

9. "लॉकडाऊनमुळे अंगणवाडीसेविका आर्थिक संकटात". Marathi.thewire.in (Marathi भाषेत). 24 April 2020. 9 November 2022 रोजी मूळ पान पासून संग्रहित. 9 November 2022 रोजी पाहिले.

10. "एकात्मिक बाल विकास सेवा योजना (आयसीडीएस)". loksatta.com (Marathi भाषेत). 9 November 2022. 9 November 2022 रोजी मूळ पान पासून संग्रहित. 9 November 2022 रोजी पाहिले.

11. "गिजू भाई बधेका का शैक्षिक चिन्तन एवं आधुनिक भारतीय बाल" (PDF). gijubhaibadheka.in (hindi भाषेत). 9 November 2022. 9 November 2022 रोजी मूळ पान (PDF) पासून संग्रहित. 9 November 2022 रोजी पाहिले.

12. "TARABAI MODAK - MARATHI - PADMAJA PHATAK" (PDF). Wayback Machine (Marathi भाषेत). 9 November 2022. 9 November 2022 रोजी मूळ पान पासून संग्रहित. 9 November 2022 रोजी पाहिले.

13. "जगातील अंगणवाडी शिक्षणाची पार्श्वभूमी" (PDF). ir.unishivaji.ac.in (Marathi भाषेत). 9 November 2022. 9 November 2022 रोजी मूळ पान (PDF) पासून संग्रहित. 9 November 2022 रोजी पाहिले.

14. "Integrated Child Development Scheme (ICDS)" (PDF). cdn.s3waas.gov.in (English भाषेत). 9 November 2022. 9 November 2022 रोजी मूळ पान (PDF) पासून संग्रहित. 9 November 2022 रोजी पाहिले.